जाहिरात क्र. १/५७०, दि. १३-०८-२०२६

# पुणे महानगरपालिका

## शिवाजीनगर, पुणे ४११००५

## जाहीर सूचना

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक २७ जानेवारी २०२६ च्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ निर्गमित करण्यात आलेले असून सदर नियम दिनांक ०१ एप्रिल २०२६ पासून अमलात आले आहेत.

पुणे शहराच्या हद्दीतील सर्व नागरिक, व्यापारी, संस्था, गृहनिर्माण संस्था, आस्थापना, लोकप्रतिनिधी, तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे घटक (Bulk Waste Generators) यांना सूचित करण्यात येते की, सदर नियमानुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या नागरी अपील क्र. ६१७४/२०२३ मधील आदेशानुसार प्रत्येक नागरिक व संस्थेवर कचरा वर्गीकरण व वैज्ञानिक व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. नियमांनुसार प्रत्येक घर, दुकान, आस्थापना, कार्यालय, हॉटेल, बाजारपेठ, संस्था व इतर कचरा निर्मात्यांनी खालीलप्रमाणे कचऱ्याचे स्त्रोतावरच वर्गीकरण करणे बंधनकारक राहील.

१) **ओला कचरा**- उरलेले अन्न (खरकटे), शिळे अन्न, भाजीपाला आणि फळांचे तुकडे, सुका पालापाचोळा, फुले, झाडांच्या छाटलेल्या फांद्या आणि गवत.

२) **सुका कचरा**- प्लास्टिक, कागद, वर्तमानपत्र, वह्यांची पाने, खोकी, टिशू पेपर आणि पेपर टॉवेल,

3) **सॅनिटरी कचरा**- डायपर्स, सॅनिटरी नॅपकिन्स इ.

४) **विशेष/घातक कचरा**- बॅटरी, बल्ब, औषधे, इलेक्ट्रॉनिक कचरा इ.

**नागरिकांची जबाबदारी** -

- घरगुती कचऱ्याचे चार प्रकारांत वर्गीकरण करूनच स्वच्छता कर्मचाऱ्यांकडे/घंटागाडीत सुपूर्द करणे.
- सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये.
- प्लास्टिक, बांधकाम कचरा स्वतंत्रपणे देणे.
- ओला व सुका कचरा वेगळा देणे.
- सॅनिटरी कचरा सुरक्षितरीत्या गुंडाळून देणे.
- कचरा जाळणे, नाले, रस्त्यावर टाकणे टाळावे.

**लोकप्रतिनिधी जबाबदारी**-

- आपल्या प्रभागात/ वॉर्डात स्वच्छताविषयक जनजागृती करणे.
- नागरिकांना कचरा वर्गीकरणासाठी मार्गदर्शन करणे.
- स्वच्छता, कचरा प्रक्रिया व पर्यावरणसंवर्धन सक्रिय सहभाग घेणे.
- स्थानिक स्वराज्य संस्थेस सहकार्य करून घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ बाबत प्रभावी अंमलबजावणी करणे.

**Bulk Waste Generators (BWG) मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे यांची जबाबदारी**-

ज्या संस्था/ इमारती/ संकुले यांचे क्षेत्रफळ २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त आहे किंवा दररोज १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण होतो अथवा ४०,००० लिटरपेक्षा जास्त पाण्याचा वापर होतो, अशा आस्थापनांना Bulk Waste Generators म्हणून घोषित करण्यात आले आहे.

**अशा संस्थांनी जबाबदारी**-

- ओल्या कचऱ्याची जागेवरच कंपोस्ट/बायोगॅस प्रक्रिया करणे.
- कचऱ्याची स्वतंत्र साठवणूक व वर्गीकरण करणे.
- प्रक्रिया न झालेला कचरा उघड्यावर टाकू नये.
- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियमांचे पालन करावे.
- अधिकृत कचरा प्रक्रिया यंत्रणेशी समन्वय ठेवणे बंधनकारक राहील.

नियमांचे उल्लंघन करणा-या व्यक्ती, संस्था किंवा आस्थापनांवर "Polluter Pays Principle" नुसार दंडात्मक कारवाई व पर्यावरण भरपाई आकारण्यात येईल.

तरी सर्व नागरिकांनी पुणे शहर स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक शहरनिर्मितीसाठी घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ चे काटेकोर पालन करावे, ही विनंती.

**जावक क्र.** : मआ/ घकव्यका/२३५८
**दिनांक** : ११-०८-२०२६
**ठिकाण** : पुणे

शिक्का

**नवल किशोर राम**
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

# पुणे महानगरपालिका

## शिवाजीनगर, पुणे ४११००५

## जाहीर सूचना

### (स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्थेस वर्गीकृत कचरा व वापरकर्ता शुल्क देणेबाबत)

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक २७ जानेवारी २०२६ च्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ निर्गमित करण्यात आलेले असून सदर नियम दिनांक ०१ एप्रिल २०२६ पासून अमलात आले आहेत.

पुणे शहराच्या हद्दीतील सर्व नागरिक, व्यापारी, संस्था, गृहनिर्माण संस्था, आस्थापना, लोकप्रतिनिधी, तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे घटक (Bulk) Waste Generators) यांना सूचित करण्यात येते की, सदर नियमानुसार प्रत्येक नागरिक व संस्थेवर कचरा वर्गीकरण व वैज्ञानिक व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. नियमांनुसार प्रत्येक घर, दुकान, आस्थापना, कार्यालय, हॉटेल, बाजारपेठ, संस्था व इतर कचरा निर्मात्यांनी कचऱ्याचे स्त्रोतावरच वर्गीकरण करणे बंधनकारक राहील.

तसेच मा. महानगरपालिका सभा ठराव क्र. ४२३, दिनांक १५/०३/२०२४ अन्वये स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्थेच्या कचरा वेचकांमार्फत दारोदारी कचरा संकलन करणेस मान्यता प्राप्त असून त्यासाठी सदर कचरा वेचकांना नागरिकांकडून खालीलप्रमाणे वापरकर्ता शुल्क आकारण्याची मुभा दिली आहे.

| वर्ष | रहिवाशी घरे (प्रति घर / प्रति महिना) | व्यावसायिक आस्थापना (प्रति आस्थापना / प्रति महिना) | झोपडपट्टीतील घरे (प्रति घर / प्रति महिना) |
|---|---|---|---|
| २०२६ | ९५ रु. | १९० रु. | ७५ रु. |

घरे, झोपडपट्टी व व्यावसायिक दुकाने या व्यतिरिक्त मोठी दुकाने, शोरूम, शाळा, कॉलेज, ऑफिस, अशा आस्थापना ज्यांचा कचरा ४ / ५ किलो प्रतिदिनहून जास्त आहे त्यांच्याबरोबर चर्चा करून कचरा उचलण्याची व्यवस्था व त्याचे नियम, सेवा शुल्क दर स्वच्छ संस्थेचे कचरावेचक व संबंधित संघटना/ ऑफिस/ आस्थापनेच्या अधिकाऱ्यांमध्ये सामंजस्याने ठरविण्यात येतील.

कृपया नोंद घ्यावी की, घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ (Solid Waste Management Rules, 2026) अन्वये नागरिकांनी कचरावेचकांना वर्गीकरण केलेला कचरा देणे बंधनकारक आहे. कचरा ओला, सुका, सॅनिटरी (लाल ठिपका चिन्हांकित) व "विशेष काळजी" कचरा अशा प्रकारे वेगळा करून द्यावा. सर्व नागरिकांनी आपला कचरा ओला, सुका, सॅनिटरी व इतर प्रकारात वर्गीकरण करून कचरावेचकांना द्यावा व पुणे शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

**जावक क्र.** : मआ/ घकव्यका/२३५६
**दिनांक** : ११-०८-२०२६
**ठिकाण** : पुणे

शिक्का

**नवल किशोर राम**
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

# पुणे महानगरपालिका

## शिवाजीनगर, पुणे ४११००५

## जाहीर सूचना

### (घनकचरा व्यवस्थापन, दंड आकारणीबाबत)

शासन निर्णय क्र. एसडब्ल्यूएम-२०१८/सी.आर १२६ (१) (नवि ३४) नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन दि. १ जुलै २०१९ अन्वये तसेच महापालिका आयुक्त ठराव क्र.३४७ दिनांक १९-०१-२०२४ व महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/८९ दिनांक २२-०५-२०२४ तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक २७ जानेवारी २०२६ च्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ निर्गमित करण्यात आलेले असून सदर नियम दिनांक ०१ एप्रिल २०२६ पासून अमलात आले आहेत. त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ च्या तरतुदींचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती / संस्थांकडून खालीलप्रमाणे दंड वसूल करण्यात येईल.

| अ.क्र. | कृती/बाब | दंड रक्कम |
|---|---|---|
| १ | सार्वजनिक ठिकाणी/रस्ता/मार्गावर अस्वच्छता करणे, कचरा टाकणे (मा. महानगरपालिका सभा ठराव क्र. ३४७. दिनांक १२-०१-२०२४) | र.रु. ५००/- |
| २ | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे (मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/३३३, दि. ३१-०८-२०२०) | र.रु. १०००/- |
| ३ | उघड्यावर लघवी/लघुशंका करणे (शासन निर्णय क्रमांक : स्वमअ- २०१७/प्र.क्र.२५६/ नवि-३४, दिनांक ७ सप्टेंबर २०१८.) | र.रु. २००/- |
| ४ | उघड्यावर शौच करणे (शासन निर्णय क्रमांक : स्वमअ-२०१७/प्र.क्र.२५६/नवि-३४, दिनांक ७ सप्टेंबर २०१८.) | र.रु. ५००/- |
| ५ | सार्वजनिक ठिकाणी शहरातील नाले आणि जल संस्था (नदी, तलाव, घाट) आसपासचा परिसर अस्वच्छ करणे. (मा.महानगरपालिका सभा ठराव क्र. ३४७, दिनांक १९-०१-२०२४) | र.रु. ५००/- |
| ६ | कचरा जाळणे (मा.महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/८९, दि. २२-०५-२०२४) | र.रु. ५०००/- |
| ७ | जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम १९९८ व तदनंतर वेळोवेळी करण्यात आलेल्या अधिसूचनांची अंमलबजावणी न केल्यास The Environment (protection) act 1986 सेक्शन १५ नुसार कारवाई | र.रु. १,००,०००/- पर्यंत दंड किंवा ५ वर्षेपर्यंत कारावास किंवा दोन्ही |

| अ.क्र. | कृती/बाब | दंड रक्कम | |
|---|---|---|---|
| | | पहिल्या वेळेस | पुढील प्रत्येक वेळेस |
| ८ | कचऱ्याचे विलगीकरण न करणे (ओला, सुका, घरगुती घातक व सॅनिटरी कचरा) (मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/८९, दि. २२/०५/२०२४.) | र.रु. ३००/- | र.रु. ५००/- |
| ९ | सार्वजनिक सभा/ समारंभ संपल्यावर चार तासांच्या आत स्वच्छता न केल्याबद्दल (शासन निर्णय क्र. एसडब्ल्यूएम-२०१८/ सी.आर १२६ (१) (नवि ३४) नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन दि. १ जुलै २०१९.) | स्वच्छता अनामत रक्कम जप्त करणे | |

**जावक क्र.** : मआ/ घकव्यका/२३५७
**दिनांक** : ११-०८-२०२६
**ठिकाण** : पुणे

शिक्का

**नवल किशोर राम**
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका